# जिल्हा परिषद,अमरावती

श्री.शंकर कवाडे वरीष्ठ सहायक,आरोग्य विभाग,
यांचे निलंबन आदेश रद्द करणेबाबत.

क्रमांक/जिप/साप्रवि/चौकशी/ ७५७ /२०१६
सामान्य प्रशासन विभाग
दिनांक: १७ ऑक्टोबर,२०१६

## आदेश

ज्याअर्थी श्री.शंकर कवाडे वरीष्ठ सहायक म्हणून आरोग्य विभाग जि.प.अमरावती येथे कार्यरत आहेत. आणि ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक:सेवार्थ-२०१४/प्र.क्र.३९/वित्त-५ दि १५/९/२०१५, आणि या जिल्हा परिषदेचे परिपत्रक क्रमांक जिप/साप्रवि/लेखा/५४७८/२०१५ दि.२ जूलै २०१५ नसार सर्व संवर्गातील कर्मचारी अधिकारी यांचे वेतन दरमहा एक तारखेला करण्याबाबत निर्देशित केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, प्राथमिक आरोग्य केन्द्र,सेमाडोह केन्द्रातील अधिकारी कर्मचारी यांचे वेतन दरमहा एक तारखेला होत नाही तर काही केंद्रातील कर्मचाऱ्यांचे वेतन फार उशिराने होत असल्याच्या तक्रारी प्रत्यक्ष भेटून कर्मचाऱ्यांनी केल्या असता श्री.शंकर कवाडे वरीष्ठ सहायक यांना कार्यालयाचे आदेश क्रमांक/जिप/साप्रवि/चौकशी/७३०/१६ दिनांक ४/१०/२०१६ अन्वये निलंबित करण्यांत आले होते.

त्याअर्थि, दिनांक १०/१०/२०१६ रोजी श्री.शंकर कवाडे व.सहा.यांची प्रत्यक्ष सुनावणी घेवून संबंधित कर्मचाऱ्यांनी भविष्यात चूक न करण्याचे मान्य केले तसेच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिनांक ६/१०/२०१६ रोजीच्या पत्राअन्वये संबंधिताचे यापुढील चांगल्या कामाची जबाबदारी घेतली आहे. त्यावर विश्वास ठेऊन याआदेशाद्वारे श्री.शंकर कवाडे वरीष्ठ सहा.यांचे दि.४/१०/२०१६ रोजीचे निलंबन आदेश रद्द करण्यांत येत आहे. तसेच श्री.कवाडे वरिष्ठ सहायक यांना कामाकडे लक्ष देण्याबाबत सक्त ताकीद देण्यांत येत आहे.

(डॉ.किरण कुलकर्णी भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,अमरावती

प्रतिलीपी

१)उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जि. प.अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस
२)जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद,अमरावती यांना पुढील कार्यवाहीस अग्रेषित.
३)प्रशासकीय अधिकारी,आरोग्य विभाग,जि.प.अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस.
४)गट विकास अधिकारी पंचायत समिती,धामणगांव रेल्वे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस.
५)श्री.शंकर कवाडे वरिष्ठ सहायक वेतन लिपीक आरोग्य विभाग,जि.प.अमरावती यांना आवश्यक कार्यवाहीस रवाना.

(डॉ.किरण कुलकर्णी भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी